# लोकमंगल आयटीआयची इंडस्ट्रियल व्हिजिट २०२३

दि. ३१/०१/२०२३ लोकमंगल शुगर बीबी दारफळ येथे आज लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी इंडस्ट्रियल व्हिजिट चे आयोजन करण्यात आले होते. उसाच्या रसाचे गाळप करणाऱ्या मशीन त्यांचे नियंत्रण करणारे पॅनल्स , विविध यंत्रे , मोटारी, क्रेन, विज निर्मिती प्रकल्प, इलेक्ट्रिकल युटीलिटी, व्ही एफ डी स्टार्टर पॅनल, अल्टरनेटर अशा विविध मशीन्स वास्तविकतेमध्ये कशा असतात यांची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून या व्हिजिटचे आयोजन करण्यात आले होते. माननीय प्राचार्य योगेश गायकवाड सर यांच्या मार्गदर्शनाखाली निदेशक श्री बाळासाहेब जाधव सर, निदेशक श्री प्रदीप विटकर सर, निदेशक श्री रमेश लवटे सर यांच्या निरीक्षणा मध्ये ६३ विद्यार्थी या व्हिजिटमध्ये सहभागी झाले होते.

